# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


प्रेसनोट क्रमांक :- ३२२ दिनांक :- १८/११/२०२१

## कपडयाच्या दुकानात चोरी करणारे व दुधाच्या पिशव्या चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन ३ गुन्हे उघडकीस आणण्यात नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक २९.०८.२०२१ रोजीचे २२.३० वा. ते दि. ३०.०८.२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा. दरम्यान फिरोज इब्राहिम शेख, वय ४७ वर्षे, यांचे फस्ट चॉईस नावाचे कपडे विक्रीचे शॉपची ताडपत्री कापुन त्यामधुन ६२,८५०/- रु. किं. चे लेडीज कुर्ता व प्लाझो, लॉंग कुर्ता, फॅन्सी कुर्ता व फॅन्सी पिस असा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केलेबाबत नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ६१०/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे श्री. सिध्दीक इब्राहिम पठाण, वय ५८ वर्षे, यांचे तात्पुरत्या कापडी टेंट मधुन ३५,०००/- रु. किं.चे लेडीज कुर्ता, टॉप शर्ट असा माल चोरी केलेबाबत नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ६२९/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ४६१,३८० प्रमाणे दुसरा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने चोरट्यांचा शोध घेणेबाबत मा. वरिष्ठांनी सुचना दिलेल्या होत्या. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तपास करुन तांत्रिक बाबींच्या आधारे व गुप्त बातमीदाराचे माहितीवरुन संशईत नामे १) मनीसिंग ऊर्फ मनी हरचरण ऊर्फ विकी सिंग आनंद वय २७ वर्षे व २) दर्शन ऊर्फ दर्शु राजेश पाटील वय २६ वर्षे यांना ताब्यात घेवून नमुद इसमांकडे गुन्ह्याचे अनुषंगाने कसुन व कौशल्यपुर्ण तपास केला असता त्यांनी वरील प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीतांकडुन चोरी केलेल्या मालमत्तेपैकी ५९,९५०/- रु. किंमतीचे कपडे व गुन्हा करतांना वापरलेली मोटार सायकल हस्तगत करुन दोन्ही गुन्हयाची उकल करुन सदर आरोपीतांना अटक केली आहे.

दिनांक १२.११.२०२१ रोजी सकाळी ०६.३० वा. चे सुमारास श्री. किरण मांगीलाल चौधरी, श्री. दिनानाथ कन्हैयालाल गुप्ता, व श्री. लल्लन केदार गुप्ता या तिघांचे शॉपचे बाहेर विक्रीसाठी प्लास्टीक कॅरेटमध्ये ठेवलेले ४,८९६/- रु. किं.च्या २०४ दुधाच्या पिशव्या एका मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी चोरी करुन नेलेबाबत फिर्यादी श्री. किरण मांगीलाल चौधरी, वय २६ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ७७२/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदाराचे मार्फतीने शोध घेवून आरोपी नामे १) कृष्णा रामलाल यादव, वय ३० वर्षे व २) ओमप्रकाश ऊर्फ जयप्रकाश नंदलाल यादव वय २० वर्षे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपूस केली असता नमुद आरोपीतांनी वरील गुन्हा केल्याची कबुली देऊन चोरी केलेले दुध हे विकास रंगबहादुर यादव, वय १९ वर्षे, यास विक्री केल्याची माहिती दिली. विकास यादव याने विकत घेतलेले चोरीचे दुध त्याने ग्राहकांना विक्री करुन आलेले ४२००/- रु. रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे. तसेच दुध चोरी करणा-या आरोपीतांकडुन दुधाचे ५ कॅरेट व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल जप्त करुन गुन्हयाची उकल करण्यात आलेली असून सदर आरोपीतांना अटक केली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहळ, पोशि/०४२८६ गणेश जावळे, पोशि/३४५८ संदिप जाधव, पोशि/३९२४ सुरज घुणावत यांनी केलेली आहे.

----------ooooo-----------